# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

विज्ञान निर्भयता नीती

**मध्यवर्ती कार्यालय :– 'तारांगण'**, कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी, शाहू नगर, गोडोली, सातारा– ४१५००१.
दूरध्वनी :(०२१६२)२२०६५९, मोबाईल: ९४२३८६६५४०. ई–मेल ndabholkar123@gmail.com

**राज्य कार्याध्यक्ष संपर्क:– 'भास्कर'**,६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे–४२४००१.
दूरध्वनी : (०२५६२) २४४२६९, मोबाईल–९४२२७९०६१०, ई–मेल avinashpatilmans@gmail.com


## <u>विशेष लेख</u>

# आधुनिक बुवाबाजी : शोषणाचे हत्त्यार

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाची ओळख ही देवधर्माच्या नावाने चालणाऱ्या बुवाबाजीच्या विरोधात लढणारी संघटना म्हणून आहे. आधुनिक बुवाबाजीच्या विरोधासाठी त्याचा वैचारिक पाया स्पष्ट करताना अंधश्रद्धा निर्मूलनाच्या व्यापक कार्यक्रमास भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी ऐतिहासिक आढावा व भविष्यवेधाची चर्चा आवश्यक आहे. त्यानिमित्ताने अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विविध पैलूंवर वैचारिक प्रकाशझोत टाकणारा विशेष लेख. –**

**अविनाश पाटील, राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंनिस.**

**बुवाबाजी कोणत्या मानसिकतेमुळे यशस्वी होते. त्याची मांडणी व प्रतिवाद.**

१) चमत्कार करणारे बाबा हे असा दावा करतात की, त्यांचा चमत्कार हा परमेश्वराने त्यांना दिलेले व्हिजीटींग कार्ड आहे, त्यामुळे लोकांना समजावे की, आपल्या मुक्तीसाठी परमेश्वराने या महामानवाला पाठवले आहे. ही त्यांची मांडणी बदमाशीची आहे, त्याचा स्पष्ट विरोधी करावा.

२) चमत्कार न करणारे अनेक बाबा तेजीत आहेत. त्यांच्या भक्तांचा प्रतिवाद असा असतो की, 'आम्हाला बाबांच्या भक्तीत काहीच साधावयाचे नाही. फक्त भक्तीच साधावयाची आहे.' 'ही भक्ती कशासाठी?' याचे उत्तर तत्परतेने असे मिळते की, या भक्तीत जीवनाचे सार्थक आहे. 'हे सार्थक कशामुळे होते?' याचे उत्तर येते की, या भक्तीतून जीवनाचे आध्यात्मिक कल्याण घडते.' यानंतर आध्यात्मिक कल्याण होते याचा पुरावा द्या. हा प्रश्न अप्रस्तुत असतो. कारण तसा पुरावा मागू नये अशी धारणा असते. पुरावा मागणे ही डोळसपणाची सुरुवात असते आणि पुरावा न मागता शरण जाणे ही बुवाबाजीच्या श्रद्धावान मानसिकतेची पूर्वअट असते. बाबाचे असे म्हणणे असते की, भक्ताचे कल्याण कशात आहे. हे त्याला समजते आणि ते भक्ताला समजणार नाही हे ही बाबाला समजते.

३) श्रद्धेने महाराज अथवा गुरु यांच्यामार्फत जे सत्य स्वीकारले जाते त्याची भूमिका

सर्वसाधारणपणे अशी असते की, काही सत्यांचे ज्ञान, मानवी ज्ञान शक्तीच्या पलीकडचे आहे. हे ज्ञान सर्वश्रेष्ठ मानवी कल्याण साधण्यासाठी आवश्यक आहे. परमेश्वर कृपेने लोककल्याणासाठी काही अधिकारी व्यक्तींमध्ये ते ज्ञान प्रकटते. माझ्या बाबांमध्ये ते ज्ञान प्रकटले आहे. या ज्ञानाचा आशय असलेली विधाने सत्य आहेत की असत्य हे सिद्ध करणे मानवी शक्तीच्या पलीकडचे आहे. संबंधित अधिकारी पुरुषावर, म्हणजेच आपल्या महाराजांवर असलेल्या श्रद्धेनेच हे ज्ञान स्वीकारावे लागते.

वरवर पाहता समर्पक वाटणारी ही भूमिका आंतरविसंगतीने पुरेपूर भरलेली आहे. ही आंतरविसंगती कार्यकर्त्याला स्वत:ला समजावयास हवी आणि इतरांना समजून सांगता यावयास हवी. उदा. अ) मानवी ज्ञानशक्ती पलीकडे असलेले सत्य आहे आणि तरीही त्याचे ज्ञान माणसाला होऊ शकते. असे या भूमिकेत गृहीत धरले आहे. स्वत:च्या कातडीमधून बाहेर उडी घेण्यासारखा हा प्रकार झाला. ब) सर्वश्रेष्ठ मानवी कल्याण करणारे हे ज्ञान आहे आणि ते सर्वज्ञ असलेल्या माझ्या महाराजांना प्राप्त झाले आहे, या बाबतीतही पुरावा काही नाही. हे सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे आणि ते माझ्या महाराजांना प्राप्त झाले आहे ही बाब (अंध) श्रद्धेने स्वीकारावी लागते. क) कोणी सर्वज्ञ आहे. असे स्वत: सर्वज्ञ असल्याशिवाय समजणे शक्य नाही आणि महाराजांचा भाविक असा सर्वज्ञ आहे असा त्याचाही दावा नसतो त्यामुळे महाराजांची सर्वज्ञता ही देखील न तपासलेलीच बाब राहते.

ड) ईश्वर आहे आणि त्याने महाराजाला अधिकार दिला आहे हे माहीत झाल्यामुळे, संबंधित व्यक्तीला मानव मानत नाहीत. उलट त्या व्यक्तीला अधिकारी मानत असल्यामुळे तिला ईश्वराने मानवीशक्तीपलीकडचे ज्ञान दिले असे भक्त मानतो. ईश्वर आहे की नाही, मानवी शक्तीपलीकडचे ज्ञान आहे की नाही हे माहीतच नसताना त्याने अमूक एका व्यक्तीला ज्ञानाचा अधिकार दिला हे कसे कळते? असे कळते असे मानणे म्हणजे शांग्रील नावाचा प्रदेश आहे की

***भक्ताचे कल्याण कशात आहे, हे मला समजते आणि ते त्याला समजणार नाही, हेही समजते या युक्तिवादाचा प्रतिवाद करावयास हवा.***

***बाबा भौतिक स्थिती व प्रारब्ध बदलाते, वासना विकार नष्ट करतो, मोक्षाप्रद नेतो, असे दावे केले जातात, याचा फोलपणा समजावून सांगणे गरजेचे.***

***गुरु ध्यान व मंत्र, सत्संग आणि गुरुभोवतीची स्पंदने याद्वारे भक्ताचे कल्याण करतो, ही मांडणी अशास्त्रीय व दिशाभूल करणारी आहे.***

***बाबा काही चांगली कामे करतात, त्यामुळे त्यांची बुवाबाजी क्षम्य मानता कामा नये.***

नाही हेच माहीत नसताना, अमका–तमका माणूस शांग्रीलाचा राजा आहे असे मानण्यासारखे आहे.

इ) या सर्व बाबतीत व्यक्ती प्रत्यक्षात आपआपले बाबा, बुवा, गुरु, महाराज यावर श्रद्धा ठेवून अनुभव, तर्क, पुरावा या पलीकऐडे उडी मारत असतात.

४) ज्याप्रमाणे चांगली शाळा, चांगला शिक्षक, चांगला डॉक्टर शोधावा लागतो त्याप्रमाणे चांगला गुरुही शोधावा लागतो. पूर्वजन्मीचे पुण्य असेल तरच तो लाभतो. असा गुरु भौतिक जीवनाची सर्व भीती घालवतो. प्रारब्ध बदलतो. जन्म–मृत्यूच्या फेऱ्यातून व्यक्तीची सुटका करतो. अशा गुरुच्या केवळ दर्शनाने वासना विकार गळून पडतात. नैतिक उन्नती होते. आणि अक्षय आनंदाचा ठेवा मिळतो. आता या स्वरुपाच्या गुरुला, म्हणजेच बाबा महाराज यांना या मांडणीद्वारे जणू प्रतिपरमेश्वरे असे रुप दिले आहे. हे समजावून सांगायला हवे. भौतिक जीवनाची भीती प्रत्यक्ष जीवन संघर्षातून घालवावी लागते. प्रारब्ध नावाची काही गोष्ट नसते आणि जन्म– मृत्यूचा फेराही नसतो, त्यामुळे तो बदलण्याचा प्रश्नच नसतो. कोणाच्याही दर्शनाने आपोआप वासना–विकार गळून पडत नाही आणि नैतिक उन्नती होत नाही. तेव्हा या स्वरुपाचे बुवाबाबांचे गुणवर्णन हे केवळ बुवाबाजीच्या धंद्यासाठी केले जाते, हे लोकांना पटवावयास हवे.

५) भक्ताचे दु:ख गुरु तीन प्रकारे दूर करु शकतो. असे आसाराम बापूंनी आपल्या मुलाखतीत सांगितले आहे. एक ध्यान मंत्र असे अध्यात्मिक मार्ग, दोन बौद्धिक पातळीवरील सत्संग, तीन गुरुच्या भोवतीचे दैवी वलय आणि स्पंदने याद्वारे लोकांचे आजार बरे करण्यापासून ते आनंदलहरी कोट्यावधी लोकांपर्यंत पोचवण्याचे काम गुरु करतो. यात काय खरे आहे? व्यक्तीला आर्थिक, सामाजिक, शारीरिक अशा अनेक शोषणाला तोंड द्यावे लागते. त्याला ध्यान आणि मंत्र उपयोगी पडू शकत नाही. कदाचित त्याद्वारे मनात शांतता प्रस्थापित झाल्यासारखे भासेल पण खरे दु:ख निवारण होणार नाही. या कथित गुरु आणि महाराजांच्या सत्संगातील विचार हे तर बहुतांश वेळा अत्यंत असंबद्ध आणि अनेकदा अशास्त्रीय व दिशाभूल करणारे असतात. कोणत्याही गुरु वा महाराज याच्याभोवती कसलेही अदृश्य दैवी वलय नसते आणि त्याची कसलीही स्पंदने लोकांचे आजार बरे करु शकत नाहीत. ही अंधश्रद्धा पसरवणे हीच बुवाबाजी आहे.

६) हे सर्व बाबा स्वत:मध्ये विलक्षण गुंतलेले असतात. त्यांची सर्व आखणी व्यक्तिमहात्म्य वाढवणारी असते. बाबांच्या भक्तांचे विशिष्ट रंगाचे कपडे, विशिष्ट रंगाच्या माळा, छातीवर महाराजांचा फोटो असलेला बिल्ला तसेच पेन, महाराजांनी दिलेला जीवन उद्धरुन नेणारा एखादा छोटा–मोठा मंत्र, यामधून प्रथम एकजुटीची भावना निर्माण होते. या भावनेत एक समाधान व सामर्थ्य असते. पुढे–पुढे या सर्व वातावरणाची सवय होते त्याच्याशिवाय राहणे

अशक्य होते. तशी इच्छा एखाद्या भक्ताला झालीच तर त्यावर चाकोरीबाहेर न राहण्याची सक्ती केली जाते.  या सर्वांमध्ये एक प्रकारची गुप्तता असते. महाराजांची  भक्ती सोडून सर्व जीवन व्यर्थ आहे. असे वाटणे ही जीवनाची  इतिकर्तव्यता बनते. महाराजांना विरोध करणे महापाप ठरते. त्यांना विरोध करणाऱ्या दुर्जनांचा नाश पुण्यदाई मानला जातो. महाराजांच्या अनुग्रहानेच जीवनाचे कोट कल्याण होईल, असा संदेश बिंबवला जातो. यामुळे भक्त हा कडवा सैनिक बनतो. बुवाबाजी ही एक अभेद्य व्यूहरचना बनते. ती टिकवून ठरण्यासाठी सतत ब्रेन वॉशिंग चालू राहते. या सर्वातून माणसाचे वैशिष्ट्य असलेले चिकित्सक बुद्धी तहकूब केली जाते.

७) वरील सर्व बाबींचा एकत्रित परिणाम असा होतो की, मानसिक गुलामगिरी निर्माण होते. हातापायातील बेड्या या स्वातंत्र्याचे अडथळे वाटण्याऐवजी फुलांचे गजरे वाटू लागतात. राजकीय, आर्थिक पारतंत्र्यापेक्षा हे मानसिक पारतंत्र्य अधिक घातक असते. बुवा, महाराज, स्वामी असे लोक माणसाच्या बुद्धीची हत्या करण्याचे जणू कारखानेच चालवतात.

८) असे बाबाबुवा महाराज हे काही चांगली कामे करतात त्याकडे बघून आणि त्या कामाचे महत्त्व जाणून त्यांचे मोठेपण मान्य करावे. असा प्रतिवाद अनेकांकडून केला जातो. काही चांगली कामे बाबा करत असतीलही; परंतु ती चांगली कामे ते करु शकतात. याचे कारण त्यांची बुवाबाजी जोरात चालते. त्यांना शब्दश: अफाट पैसा मिळतो आणि मग स्वाभाविकपणेच लोकांकडून मिळालेले या पैशातील काही भाग हा लोकांना परत देण्याचा व्यावहारिक शहाणपणा ते दाखवतात. मात्र ही सर्व कामे ज्या विश्वस्त न्यासामार्फत होतात. ते विश्वस्त  न्यास, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे  ही मंडळी आपल्या घट्ट पकडीत ठेवतात. आता याचीच तुलना आपण प्रचलित लोकशाहीशी करु. बाबा आश्वासन देतात. त्याचप्रमाणे निवडून जाणारेही आश्वासन देतात. बाबांना लोकांकडून, भक्ताकडून पैसा मिळतो. सत्तारुढ लोकांना लोकांकडूनच, कररुपाने पैसा मिळतो. बाबांपेक्षा अक्षरश: हजारो पटीने हे लोकप्रतिनिधी काम करतात. कोणताही बाबा ५–५० कोटी रुपये खर्च करतात; परंतु सरकार म्हणजेच लोकप्रतिनिधी आरोग्य, शिक्षण, विकास यावर हजारो कोटी रु. खर्च करतात. आपल्याला त्याचे काहीही विशेष कौतुक वाटत नाही आणि ते बरोबरच आहे. कारण ते पैसे आपणच म्हणजेच सामान्य नागरिकांनीच कररुपाने दिलेले असतात; पण मग बाबांचे पैसेही तसेच त्याच्या भक्तांनी दिलेले असतात.  ते त्याचे स्वत:चे नसतात; परंतु याहून महत्त्वाचा भाग म्हणजे शासन जे पैसे खर्च करते. त्याचा विनियोग तपासण्याचा आणि प्रसंगी तो अयोग्य वाटला तर त्यावर कारवाई करण्याचा आणि गरज पडली तर ते लोकप्रतिनिधी आणि सरकार बदलण्याचा नागरिकाला वैधानिक अधिकार असतो. तपासण्याची मुभा हे लोकशाहीचे मोठे बळ असते.बाबा आणि बुवा यांचा एकूण व्यवहार आपणास तपासण्याची मुभा नसते. कारण तो श्रद्धेवर आघात मानला जातो. मात्र लोकशाहीत तपासले तर असे बिलकूल मानले जात नाही. बाबांचे ट्रस्ट खासगी म्हणून त्याचे व्यवहार गुप्त असतात. मात्र शासनाचे हजारो कोटीचे व्यहार खुले असतात, निदान असावेत अशी तरतूद आहे. ही भूमिका

नीट लक्षात घेतली तर बाबा बुवा यांच्यात विधायक कामाबद्दल सद्भावना व्यक्त करतानाही त्याबाबतची मर्यादा व वास्तव नीटपणे समजून घेण्याची गरज आहे.

**आध्यात्मिक बुवाबाजी–** ज्या आध्यत्मिक कल्याणासाठी, बाबाबुवाकडे जावयाचे ते आध्यात्मिक कल्याण म्हणजे काय? याची एकवाक्यता असल्याने एकसंध मांडणी नाही. मात्र आध्यात्मिक यशस्वी जीवन हेच जीवन सार्थक मानले जाते. बौद्धिक प्रतिवादाने माणसाच्या मनातील या कथित आध्यात्मिकतेचा प्रतिवाद करणे अवघड असते, यासाठी अध्यात्माचा पारंपरिक व बऱ्यापैकी सर्वमान्य अर्थ क्षणभर मान्य करु. तो असा आहे की, प्रत्येक व्यक्तीत एक चैतन्य आहे. तो त्याचा आत्मा. एक चैतन्य विश्व व्यापून राहिले आहे तो परमात्मा. या आत्म्याची परमात्म्याशी गाठ पडली की आध्यात्मिक मुक्ती मिळते. आता या मांडणीच्या शब्दबंबाळपणात न जाता आपण असा प्रश्न उपस्थित करु शकतो की, ज्याच्या जीवनात असे आध्यात्मिक उन्नयन झाले आहे. अशी व्यक्ती ओळखावयाची कशी? याबाबतही बहुतांशी एकमत आहे. अशी व्यक्ती जीवनात संयमी आणि सदाचारी असते. अपरिग्रही राहते. ती करुणेने मानवसन्मुख कृती करते. तिच्या जीवनात सुचिता आणि पावित्र्य असते आणि त्याचा सहज प्रत्यय इतरांना येतो. जे आचरणात येते ते अध्यात्म, बाकीची फक्त पोकळ बडबड, असा याच अर्थ आहे. या निकषावर आपण कथित आध्यात्मिक बुवा आणि खरी नैतिक आध्यात्मिकता जोपासणारे बाबा यांची तुलना करावयास हवी. निर्मला माता, नरेंद्र महाराज, सत्यसाई बाबा, आसाराम बापू आणि त्या श्रेय नामावलीतील अनेक बाबा–बुवा यांनी प्रचंड भपकेबाज जीवनसंस्कृती अवलंबली आहे. भारी आलिशान गाड्या, भव्य संगमरवरी प्रसाद, स्वतःचे विमानतळ, स्वतःच्या कथित आध्यात्मिक सेवेचे व्यावसायिकरण, असा सर्व थाटमाट असतो. ज्ञानेश्वरीचा सप्ताह घालणारे ह.भ.प. महाराजदेखील लाखाच्या घरात बिदागी घेतात, निर्माण केलेले विश्वस्त निधी आपल्याच हातात ठेवतात. दुसऱ्या बाजूला गाडगेबाबांचे उदाहरण अतिशय बोलके आहे. त्यांनी कोट्यवधी रु. जमविले पण स्वतःच्या नावावर एक पैसा ठेवला नाही. स्वतःची त्यांची मालमत्ता म्हणजे अंगावरील चिंध्याची कापडे आणि हातामधील भिक्षा मागण्यासाठीचा खापराचा तुकडा. म. गांधी, विनोबा ही माणसे नैतिक अर्थाने श्रेष्ठ अध्यात्मिक होते. महात्मा गांधी जन्मभर एका पंचावर जगले. विनोबाजींनी संपूर्ण देशाची दोनदा पदयात्रा केली आणि काही लाख एकर जमीन मिळवली आणि वाटली. आयुष्यभर ही माणसे निर्धन राहिली साधी राहिली आणि अत्यंत उत्कटपणे समाजसन्मुख राहिली.

**बुवाबाजीचा प्रतिकार कसा करावा**

१) ज्या बुवाबाजीमुळे कोणत्याही कायद्याचा भंग होत असेल अशा बाबतीत कायद्याचा वापर परिणामकारकपणे करावा. मात्र त्यासाठी परिस्थितीबाबत व्यवस्थित पुरावा मिळावयास हवा तसेच त्या संदर्भातील कायदेशीर तरतुदीचाही नीट अभ्यास करावयास हवा. पोलिस यंत्रणा व प्रसार माध्यमे यांना विश्वासात घेऊन, सोबत बरोबर घ्यावयास हवे.

२) कोणीही बाबा, कसल्याही चमत्काराचा दावा करत असल्यास, त्याला भेट आव्हान द्यावे, त्यामुळे त्याचा दबदबा कमी होतो

३) बाबा अथवा त्याचे अनुयायी हिंसक चिथावणी देतात अथवा हिंसक कृत्य करतात जसे नरेंद्र महाराज यांनी जाहीरपणे एन.डी. पाटील, दाभोलकर यांचे हात–पाय तोडण्याची धमकी दिली किंवा अंनिसच्या पिंपरी–चिंचवडच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली अथवा त्यांच्या धर्मदंड विमानतळाच्या नियमाप्रमाणे ताब्यात घेतला म्हणून त्यांच्या अनुयायांनी विमानतळाची नासधूस केली. अशा गोष्टीबाबत त्वरित परखड प्रतिक्रिया समितीमार्फत तसेच समाजातील मान्यवरांच्या मार्फत द्यावयास हवी.

४) बुवा–बाबांच्यामार्फत भरमसाट दावे केले जातात. जसे रामदेवबाबा योगाच्या साह्याने ताबडतोब प्रचंड प्रमाणात वजन कमी करण्याचा दावा करतो. अशा बाबतीत नियंत्रित चाचणीची गरज सांगून, सातत्याने त्याची मागणी करावयास हवी.

५) बुवाबाजीविरोधात बोलताना ही गोष्ट स्पष्ट करावी की, समितीचा देवाधर्मामा विरोध नाही तर देवाधर्माच्या नावाने जे बाबाबुवा शोषण करतात त्याला विरोध आहे. तसेच याबाबत समितीची जी भूमिका आहे, ती भूमिका महाराष्ट्रातील संत व समाजसुधारक यांच्याशी अत्यंत सुसंगत आहे.

६) बुवाबाजीविरोधात मांडणी करतांना पुढील मुद्यांचाही समावेश असावा. अ) शिक्षण संस्था, प्रसार माध्यमे व राजकीय नेते बुवाबाजी विरोधात भूमिका घेत नाहीत. त्यांनी भूमिका घेतल्यास फरक पडू शकतो. ब) जागतिकीकरणामुळे एक मोठा वर्ग रोजगाराच्या शाश्वतीपासून अस्थिर व वंचित होत आहे. यामुळेही बुवाबाजी फोफावण्यास मदत होते. क) शारीरिक व मानसिक आरोग्यविषयक अपुऱ्या सुविधामुळे लोकांचे बाबाकडे जाण्याचे प्रमाण वाढते. ड) जागतिकीकरण, अपुऱ्या आरोग्य सुविधा याबद्दल बुवाबाबा कधीही काही बोलत नाहीत कारण व्यापक परिवर्तनाला त्यांचा विरोधच असतो.

७) महाराजांकडून मोठ्या प्रमाणात, विविध पातळीवरील, स्त्री–पुरुष सहजपणे एकत्र येतात. याला पर्याय देणाऱ्या क्रीडा स्पर्धा, व्याख्यानमाला,सांस्कृतिक कार्यक्रम अशा बाबींचे समितीच्या कार्यकर्त्यांकडून स्वागतच असते.

८) बुवाबाजी कोणत्या मानसिकतेमुळे यशस्वी होते. याची मांडणी व त्याचे धोके दाखवून करावयाचा प्रतिवाद वरील टिपणात केलेला आहे. आध्यात्मिक बुवाबाजीबद्दल विविध प्रश्न नेहमी येणार.


**–अविनाश पाटील,**

राज्य कार्याध्यक्ष

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

भ्रमणध्वनी– ९४२२७९०६१०


*****